भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१२-१३/२८२
आरपीसीडी.सीओ.आरआरबी.बीसी.क्र. ४१/०३.०५.३३/२०१२-१३ दि. नोव्हेंबर १, २०१२,

सर्व प्रादेशिक ग्रामीण बँका - महोदय,

**एनईएफटी प्रणाली**

आपणास माहितच आहे की, नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्स्फर (एनईएफटी) ही देशभरात असलेली प्रदान प्रणाली असून, तिच्या साह्याने कोणत्याही बँक शाखेतून, ह्या एनईएफटी नेटवर्क मध्ये भाग घेणा-या, देशातील इतर कोणत्याही बँक शाखेतील खात्यामध्ये, त्याच दिवशी किंवा त्यानंतरच्या कामाच्या दिवशी, एकास-एक असे निधी-हस्तांतरण करता येते. ज्यांचे बँक खाते नाही अशा व्यक्तीही (वॉकइन कस्टमर्स), एनईएफटीची सोय असलेल्या शाखांमध्ये, एनईएफटीद्वारा निधी पाठविण्याची सूचना देऊन, एका विशिष्ट मर्यादेपर्यंत रोख रक्कम जमा करु शकतात.

(२) आरआरबी ह्या त्यांच्या प्रायोजक बँकांमार्फत, एनईएफटी नेटवर्कचा भाग असल्या तरी, अशा आरआरबींच्या शाखांमधील कर्मचारी व सर्वसाधारण जनता ह्या दोघांच्या बाबतीत, पैसे पाठविण्यासाठी एनईएफटी सुविधा उपलब्ध असल्याची जाणीव (विशेषतः वॉक इन ग्राहकांसाठी) असल्याचे दिसून येत नाही.

(३) एनईएफटी प्रणाली व तिचे फायदे ह्याबाबत, कर्मचारी व सर्वसाधारण जनता ह्यांच्यामध्ये जाणीव निर्माण करण्याबाबत आपण योग्य ती कारवाई करावी. आमच्या डिपार्टमेंट ऑफ पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टिम्स (डीपीएसएस) ह्यांनी एनईएफटी प्रणाली वर दिलेली मार्गदर्शक तत्वे व एफएक्यु आमच्या वेबसाईटवर (www.rbi.org.in) उपलब्ध आहे

(४) ह्या बाबत केलेली कारवाई आमच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला कळविण्यांत यावी.

(५) ह्या बाबतची पोच, कृपया आमच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाला द्यावी.

आपला
(सी.डी. श्रीनिवासन)
मुख्य महाव्यवस्थापक.

ग्रामीण नियोजन आणि कर्ज विभाग, केंद्रीय कार्यालय, १० वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, पो.बॉ क्र. १००१४, मुंबई - 400001, **दुरध्वनी** : ९१-२२-२२६१ ०२६१, **फॅक्सः** ९१-२२-२२६२ १०११/२२६५ ८२७३/२२६५ ८२७६, **ईमेल** : cgmicrpcd@rbi.org.in